# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.६१५ दिनांक २८.०७.२०२०

## अट्टल घरफोडी करणारा चोर पोलीसांच्या जाळ्यात

नालासोपारा पुर्व परिसरात तुळिंज पोलीस ठाण्याचे हद्दीत घरफोडी चोरीचे घटनांना आळा घालण्याकरिता श्री. दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर, यांचे सुचनेप्रमाणे श्री. विजयकांत सागर, अप्पर पोलीस अधीक्षक, वसई विभाग व श्री. अमोल मांडवे, उपविभागिय पोलीस अधिकारी, नालासोपारा यांनी सदर घरफोडी चोरींचा आढावा घेवून अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांचा शोध घेवून त्यांना अटक करणेबाबत सुचना दिलेल्या होत्या. त्याप्रमाणे श्री.डी.एस.पाटिल वरीष्ठ पोलीस निरीक्षक, तुळिंज पोलीस ठाणे यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस उपनिरीक्षक श्री. संदीप व्हसकोटी यांना सदरच्या चोरीच्या घटनांना पायबंद बसविण्याकरीता त्यांची सत्वर उकल करण्याबाबत आदेश दिलेले होते. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक श्री.संदीप व्हसकोटी यांनी कौशल्यपुर्ण तपास करुन तुळींज पोलीस ठाणे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार राहुल प्रकाश मळेकर, वय-२९ वर्षे, धंदा-बेकार, रा.रुम नं ३०४ साई जीवदानी अपार्टमेंन्ट विनय नगर ता.वसई जि.पालघर यास गुप्त बातमीदारांमार्फत माहीती मिळवुन त्यास ताब्यात घेतले. सदर आरोपीत यास विश्वासात घेवुन तुळींज पोलीस ठाणे अभिलेखावरील दोन घरफोडीचे गुन्हे उघकीस आणलेले आहे. आरोपीत यांचे ताब्यातुन २,४५,०००/- रुपये किंमतीचे घरफोडी केलेले दागिणे, हस्तगत करण्यात आलेले आहेत. सदर पथकाने खालील गुन्हे उघडकीस आणले आहेत.

| अ.नं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं |
|---|---|---|
| १. | तुळींज पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं ६४७/२०२० भा.दं.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८० |
| २. | तुळींज पोलीस ठाणे | गुन्हा रजि नं ५७६/२०२० भा.दं.वि.सं.कलम ४५४, ३८० प्रमाणे, |

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक श्री. डी.एस.पाटील, वालीव पोलीस ठाणे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप व्हसकोटी ,सहाय्यक फौजदार शिवानंद सुतनासे, पो.हवा युवराज जावळे पोना/आनंद मोरे, पोना/संदीप शेरमाळे, पोना/शेखर पवार, पोना/प्रशांत सावदेकर, पोशि/सुखराम गडाख, पोशि/योगेश नागरे, यांच्या पथकाने केलेली आहे.

Scanned with CamScanner



Scanned with CamScanner